# दिनांक 29/04/2025

1 रोहा पोलीस ठाणे हद्दीत हद्दीत दिनांक 27/04/2025 रोजी 08:30 वा च्या सुमारास मौजे मराठा आळी, अष्टमी येथील महिला फिर्यादी या राहत असलेल्या भाडयाच्या रूममध्ये ता. रोहा येथे, ता.रोहा फिर्यादी यांचे रूमचा दरवाजा उघडा असल्याचे पाहुन घरामध्ये प्रवेश करून फिर्यादी बाथरूममध्ये एकटया असल्याचे फायदा घेवुन आरोपीत रा.मराठा आळी, विठोबा मंदीरजवळ, अष्टमी ता.रोहा हा फिर्यादी यांचेकडे पाणी मागण्याच्या बहाण्याने बाथरूममध्ये जाउन जवळीक साधण्याचा प्रयत्न केला असता फिर्यादी यांनी आरोपीत यास "माझे अंगाला हात लावु नको' असे बोलल्या असताना देखील आरोपीत याने अंगाला स्पर्श करून फिर्यादी यांचे मनास लज्जा उत्पन्न केली

याबाबत रोहा पोलीस ठाणे गुरनं.88/2025, भारतीय न्याय संहिता कलम 74 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/टेमकर हे करीत आहेत.

2. अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 27/04/2025 रोजी 18:30 वा च्या मौजे एस ओ एस चिल्डन व्हिलेज सोगाव ता.अलिबाग येथे या संस्थेचे अनाथ आश्रम येथुन महिला फिर्यादी रा.सेव अव्हर सोल सोगाव पो.मापगाव ता.अलिबाग ह्या सांभाळ करीत असलेली अपहारीत मुलगी ही अनाथ आश्रमाचे मैदानामध्ये खेळत असताना तिस कोणीतरी अज्ञात इसमाने तिचे अज्ञान पणाचा फायदा घेवुन कोणत्यातरी कारणाकरीता तिस फुस लावुन पळुन नेले.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं.78/2025, भारतीय न्याय संहिता 2023 कलम 137 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोसई/श्रीम.मधुमती शिंदे हे करीत आहेत.

3. खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 27/04/2025 रोजी 23:15 वा च्या सुमारास मौजे खोपोली गावचे हद्दीत जुना पुणे मुंबई हायेववर एव्हरेस्ट चायनिजचे समोर रोडवर ता.खालापुर अज्ञात वाहनावरील अज्ञात चालक याने त्याचे ताब्यातील अज्ञात वाहन हे अतिवेगाने, अविचाराने, बेदरकारपणे, रस्त्याचे परिस्थीतीकडे दुर्लेक्ष करून धोकादायकरित्या चालवुन फिर्यादी यांचा छोटा भाउ वय-44 वर्षे हा रस्ता ओलांडत असताना त्यास ठोकर मारून अपघात करून अपघातातील मयत यास लहान मोठया गंभीर स्वरूपाचे दुखापती होवुन मरणास कारणीभूत होवुन अपघात ठिकाणी न थांबता निघुन गेला.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.118/2025, भारतीय न्याय संहीता कलम 106(1), 281, 125(अ)125(ब) मो.वा.का.क.184,134 प्रमाणे. गुन्हा दाखल करण्यात आला असून

अधिक तपास मपोह/सावंत हे करीत आहेत.

4. पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 28/04/2025 रोजी 15:45 वा च्या सुमारास मौजे पेण एस टी स्टॅण्ड येथे ता.पेण येथे ता.पेण येथे महिला फिर्यादी व त्यांची बहीण यांच्या मुली आजारी असल्याने अंकुर हॉस्पीटल पेण येथून उपचार करुन परत पाली येथे जाता असतांना पेण एस टी स्टॅण्ड येथुन पेण वरुन पाली येथे जाणारी बसमध्ये फिर्यादी, त्यांची बहीण व त्यांच्या मुली असे बसमध्ये जाण्यासाठी चढून सिटवर बसल्या असता तेथे आरोपीत रा.वडखळ ता.पेण फिर्यादी यांचे सिटजवळ येवून फिर्यादी यांना म्हणाला की तुम सिटसे उठ जाओ मुझे इधर बैठना है, त्यावर फिर्यादी या त्याला तुला काय मांडीवर बसवू काय असे बोलल्यानंतर फिर्यादी व आरोपीत यांच्यात सिटवरुन बसण्यावरुन वाद सुरु झाला तो वाद सुरु असतांनाच आरोपीत याने फिर्यादी यांच्या थोबाडीत मारली. फिर्यादी यांनी देखील आरोपीत याला प्रतिकार करत असतांना आरोपीत याने फिर्यादी यांना पकडून फिर्यादी यांच्या डोक्यात दोन बुक्के मारले. त्यानंतर आरोपीत हा गाडीतून बाहेर गेला म्हणून फिर्यादी या आरोपीत याचे पाठीमागे जावुन आरोपीत याला पकडण्याचा प्रयत्न केला असता आरोपीत याने पुन्हा फिर्यादी यांच्या थोबाडीत मारली व फिर्यादी यांच्या अंगावरील ड्रेसला छातीजवळ पकडून फिर्यादी यांच्या छातीवर एक फटका मारला म्हणून फिर्यादी यांच्या मनात लज्जा उत्पन्न झाली.

याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं.81/2025 भा.दं.वि.क.74,BNS ,75 115(2), प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/जाधव हे करीत आहेत.

5. रोहा पोलीस ठाणे हदीत दिनांक दि. 26/04/2025 रोजी 06:00 वा च्या सुमारास मौजे महिला फिर्यादी यांचे राहते घरी श्रीकृष्ण नगर भुनेश्वर येथे, ता.रोहा येथे फिर्यादी या घरी असताना त्यांनी बाथरूमचे बाहेर असलेल्या वॉश बेसिंनवर ठेवलेले एकूण 2,36,250/-रुपये किंमतीचे मंगळसुत्र कोणीतरी अज्ञात चोरटयाने उघडया दरवाजावाटे आत प्रवेश करून त्यांचे संमतीशिवाय लबाडीचे हेतुने चोरून नेले.

याबाबत रोहा पोलीस ठाणे गुरनं.89/2025, भारतीय न्याय संहिता कलम 305(अ) 305(a) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/साळुंखे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 28.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 228 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,21,100/-रुपये इतका दंड आकारला आहे.